दि. 10.09.2026

**प्रेसनोट**

# देवणीतील रानमाळा जुगार क्लबवर पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाची धाड

## रोख रक्कम, वाहने व साहित्यासह (12) लाखांचा मुद्देमाल जप्त

दिनांक 09.09.2026 रोजी, पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र यांच्या पथकाने देवणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या मोघा शिवारातील रानमाळा क्लबवर छापा टाकून कारवाई केली आहे. श्री गुरुनाथ क्रीडा मंडळ द्वारा संचलित, 'रायडर क्लब' या नावाने हा मनोरंजन क्लब सुरू होता.

सदर मनोरंजन क्लबवर महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगणा या राज्यातून दररोज सुमारे 200 वाहनांतून लोक जुगार खेळण्यासाठी येत असल्याची माहिती, पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांना प्राप्त झाली होती. त्यानुसार, आपल्या कार्यालयातील अधिकारी व अंमलदारांचे एक पोलीस पथक त्यांनी देवणीकडे कारवाईसाठी रवाना केले होते.

रात्री 9.30 वाजता, पोलीस पथक सदर क्लबवर तपासणीकामी पोहोचले असता, मोठ्या प्रमाणावर लोक जुगार खेळत होते. मात्र, पोलीस आल्याची चाहूल लागताच, त्यांनी तेथून पळ काढला. सदर क्लबमधून बाहेर पडण्यासाठी अनेक वाटा असल्याने, अंधाराचा फायदा घेऊन जुगारी घटनास्थळावरून पळून गेले.

सदर कारवाईत, पोलीसांनी संबंधित ठिकाणावरून, 1,04,900/-रुपयांची रोकड व 11,50,000/- रुपये किंमतीची (4) चारचाकी वाहने, कॉईन ठेवण्यासाठी वापरले जाणारे (3) स्टीलचे बॉक्स, प्लास्टीकचे कॉईन इत्यादी, असा एकूण 12,69,950/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**नोटा मोजण्याच्या मशीन सह तीन स्वाईप मशीन जप्त :**

सदर कारवाईदरम्यान, क्लब मध्ये एका नोटा मोजण्याच्या मशीनसह, 'भारत पे' कंपनीच्या तीन स्वाईप मशीन मिळून आल्या. यावरून, सदर ठिकाणी रोख रकमेसह, ऑनलाइन पद्धतीने मोठ्या प्रमाणावर पैशाची उलाढाल होत असल्याचे आढळून आले असून, सदर मशीनच्या तपासणीतून, यात नक्की किती व्यवहार होत होता, हे स्पष्ट होणार आहे.

**जुगाऱ्यांचा मद्य सेवनासाठी स्वतंत्र व्यवस्था :**

सदर क्लबवर येणाऱ्या जुगाऱ्यांना मद्य सेवनाची देखील त्याच ठिकाणी व्यवस्था करून देण्यात आली होती. कारवाईदरम्यान, क्लबमध्ये दारूने भरलेले पाच ग्लास देखील पोलीसांना आढळून आले.

नमूद प्रकरणात, सदर क्लबचे अध्यक्ष प्रमोद विद्यासागर धुमाळे रा. शिरूर अनंतपाळ व एम रामाराव, रा. हैदराबाद यांचे विरुद्ध देवणी पोलीस ठाणे येथे गु. र.न. 313/2026 कलम 4, 5 मुंबई जुगार कायदा सह कलम 68 महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, तसेच कलम 223 भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाईत, पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/ गणेश राठोड, पोहेकॉ/ गजानन डवरे इत्यादींनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

**' खबर ' हेल्पलाइन वरुन माहिती द्या :** अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलीसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइन वरून नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहचवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड